CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▸ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com

▸ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▸ वर्ष ४ थे ▸ अंक : २६४ वा ▸ गुरुवार दि. २० जुलै २०२३ ▸ किंमत : २ रु. ▸ पृष्ठे : ६

## 'वंदे मातरम्' म्हणणार नाही, इस्लामची परवानगी नाही' : अबू आझमी



**मुंबई ।** राज्याच्या पावसाळी अधिवेशनाचा तिसरा दिवस पार पडला. विधानसभा सभागृहात चांगलाच गदारोळ पाहायला दिसून आला. समाजवादी पार्टीचे आमदार अबू आझमी यांच्या वक्तव्यावरून आज सभागृहात जोरदार घमासान झाले. आम्ही 'वंदे मातरम् ' ही घोषणा देऊच शकत नाही, मी वंदे मातरम् म्हणणार नाही, इस्लामची परवानगी नाही, असे विधान अबू आझमी यांनी केले. सभागृहाचे वातावरणात गोंधळ निर्माण झाला.

# अजित पवारांकडून जनतेला योग्य न्याय मिळेल

## सत्तेच्या साठमारीत सर्वसामान्यांची परवड होऊ नये : ठाकरे

**मुंबई । प्रतिनिधी**

बंगरुळूत देशप्रेमी पक्षाची एक बैठक झाली. आमची लढाई ही कुणा एका व्यक्तीविरोधात किंवा पक्षाविरोधात नसून आमची लढाईही हुकुमशाहीविरोधात आहे. कारण पक्ष येत असतात, नेते येत असताता जात असतात, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केले आहे. तर पंतप्रधान, मुख्यमंत्री ही पदे येतात आणि जातात असेही त्यांनी म्हटले आहे.

दरम्यान उद्धव ठाकरे पुढे बओलताना म्हणाले की, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हातात राज्याच्या आर्थिक चाव्या आल्या आहेत. त्यांच्या कामाची पद्धत माहिती असल्याने जनतेना योग्य न्याय मिळेल असेही त्यांनी यावेळी म्हटले आहे. त्यांनी विधीमंडळात ठाकरे गटाच्या आमदारांची बैठक घेतल्यानंतर ते माध्यमांशी संवाद साधत होते. उद्धव ठाकरे म्हणाले की, अजित पवारांनी राज्यासाठी चांगले काम करावे, कारण सत्तेसाठी साठमारी सध्या राज्यात सुरू आहे. राज्यातील प्रश्न, शेतकऱ्यांचे प्रश्न असो असे सर्व विषयावर मी अजित पवार यांच्याशी चर्चा केली. अजित पवारांनी अडीच वर्षे माझ्यासोबत काम केले असून त्यांचा स्वभाग आणि काम करण्याची पद्धत मला माहिती असल्याने मी खात्रीने सांगतो ते जनतेसाठी काम करतील. कारण राज्याच्या तिजारीच्या चाव्या त्यांना देण्यात आल्या आहेत. अजित पवार यांनी काही दिवसांपूर्वीच राष्ट्रवादी काँग्रेसमधील आमदारांचा मोठा गट फोडला होता. त्यानंतर अजित पवार यांनी शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सामील होत उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली होती. तर राष्ट्रवादीच्या आठ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली होती.

अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादीच्या सर्व मंत्र्यांना तगडी खातीही मिळाली होती. हा महाविकास आघाडीसाठी मोठा धक्का ठरला होता. साहजिकच यामुळे अजित पवार आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये वितुष्ट निर्माण होण्याची शक्यता होती. मात्र, या सगळ्या शंका-कुशंका बाजूला सारत ठाकरे पितापुत्रांनी घेतलेली अजित पवार यांची भेट चर्चेचा विषय ठरत आहे. या भेटीत नक्की काय चर्चा झाली हे समजू शकलेले नाही. अलीकडेच अजित पवार यांनी त्यांच्या गटाचे मंत्री आणि आमदार यांच्यासह शरद पवार यांची भेट घेतली होती. त्यासाठी अजित पवार गट दोनवेळा नरिमन पॉईंट येथील यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये गेला होता. त्यामुळे अजित पवार आणि शरद पवार यांच्यातील संवादाचे दरवाजे अजूनही उघडे असल्याचा निष्कर्ष काढला जात होता. या भेटीगाठी नेमक्या कशासाठी होत्या, हे अद्याप कळू शकलेले नाही. मात्र, भाजपसोबत सत्तेत बसल्यानंतरही आता ठाकरे पितापुत्रांनीही अजित पवार यांची भेट का घेतली असावी, याविषयी राजकीय वर्तुळात निरनिराळे तर्कवितर्क लढवले जात आहेत.



### महाराष्ट्रातील जनता हुशार

**उद्धव ठाकरे म्हणाले की, अजित पवार फंड देत नाही म्हणून भाजपसोबत जाणारा शिंदे गट आज अजित पवारांसोबत काम करत आहे. महाराष्ट्रातील जनता हुशार आहे, त्यांना माहिती आहे यांनी पक्ष सोडत भाजपला साथ का दिली असे त्यांनी म्हटले आहे. आपला धृतराष्ट्र नाही तर शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आहे हे त्यांनी लक्षात ठेवायला हवे, असा इशाराही त्यांनी दिला आहे.**

### अजित पवारांबद्दल ठाकरेंना खात्री

**उद्धव ठाकरे यांनी अजित पवारांबाबत मोठं वक्तव्य करत त्यांच्याबद्दल विश्वास व्यक्त केला आहे. यावेळी ते म्हणाले की, ''अजित पवारांनी अडीच वर्ष सोबत काम केलं आहे, त्यामुळे त्यांच्या स्वभावाची कल्पना आहे आणि मला खात्री आहे की, बाकीच्यांचे सत्तेसाठी डावपेच सुरु असले तरी, त्यांच्याकडून (अजित पवार) राज्यातील जनतेला वेळेवर मदत मिळते. कारण, राज्याच्या तिजोरीच्या चाव्या पुन्हा त्यांच्याकडे देण्यात आल्या आहेत.'' अजित पवार पुन्हा अर्थमंत्री झाल्याच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी हे वक्तव्य केलं आहे.**

### 'देशप्रेमी आणि लोकशाही प्रेमी पक्षांची एक आघाडी'

**प्रसारमाध्यमाशी बोलताना उद्धव ठाकरे यांनी विरोधकांच्या 'इंडिया' आघाडी बाबतही वक्तव्य केलं आहे. ते म्हणाले की, 'देशप्रेमी आणि लोकशाही प्रेमी पक्षांची एक आघाडी स्थापन झाली आहे आणि या आघाडीचं नाव इंडिया असं आहे.'**

### असे व्हिडिओ बघत नाही

**उद्धव ठाकरे म्हणाले की, किरीट सोमय्या व्हायरल व्हिडिओ प्रकरणी राज्यभरातील महिलांनी आपली संतप्त भूमिका मांडली आहे. त्यामुळे आता सरकारने कारवाई करावी. तसेच, उद्धव ठाकरे यांनी आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांचीही भेट घेतली. या भेटीबद्दल उद्धव ठाकरे म्हणाले, अजित पवार व आम्ही पूर्वी एकत्र काम केले आहे. त्यांच्याकडे पुन्हा आता तिजोरीच्या चाव्या गेल्या आहेत. ते जनतेला मदत करतील अशी अपेक्षा आहे. विरोधी गोटात असूनही अजितदादांबद्ल उद्धव ठाकरे यांनी काढलेल्या या वक्तव्याचे आता राजकीय अर्थ काढले जात आहेत.**

# भाजपा धुळे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांचे जल्लोषात स्वागत



**धुळे । प्रतिनिधी**

धुळे महानगर जिल्हाध्यक्षपदावर गजेंद्र अंपळकर विराजमान झाले आहे. त्यांचे धुळे शहरात जल्लोषात स्वागत देखील करण्यात आले. यावेळी माजी उपमहापौर प्रभाग क्र १४ नगरसेविका कल्याणी अंपळकर, सतिश अंपळकर, धुळे मनपाच्या सभागृह नेत्या भरती माळी मोठ्या प्रमाणात नागरिक यावेळी उपस्थित होते.

भाजपाचे नुतनजिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांना राजकारणाचा दांडगा अनुभव देखील आहे. त्यांच्या वहिनी कल्याणी अंपळकर ह्या माजी उपमहापौर तथा नगरसेविका आहेत. त्यामुळे गजेंद्र अंपळकरांना राजकारणासह महापालिकेची खडानखडा माहिती आहे. गजेंद्र अंपळकर यांनी आपल्या हर हर महादेव विजय व्यायामशाळेच्या माध्यमातून उत्कृष्ट मल्ल घडविण्याचे कार्य अविरतपणे चालविले आहे. शिवाय प्रत्येकाच्या सुखा-दुः खात ते हिरीरीने धावून जातात. सण-उत्सवांमध्येही त्यांचा पुढाकार असतो. कोणतेही पद नसताना त्यांनी नागरिकांच्या अनेक समस्या सोडविल्या आहेत. सक्षम, प्रभावी व संघटन कौशल्य असलेले नेतृत्व त्यांच्या रुपाने भाजप कार्यकर्त्यांना लाभले आहे. श्री.अंपळकरांकडे जिल्हाध्यक्षपदाची धुरा दिल्याने शहरात भाजपाची ताकद आणखी वाढणार असून पक्ष संघटन वाढीसही मोठी मदत होणार आहे. आगामी काळात होणार्या महानगरपालिका, विधानसभा निवडणुकीत त्यांची भुमिका मोलाची ठरणार आहे. भाजपाने त्यांच्यासारख्या प्रामाणिक, निष्ठावंत कार्यकर्त्याला जिल्हाध्यक्षपदी विराजमान करुन त्यांना खर्या अर्थाने न्याय दिल्याची भावना कार्यकर्त्यांसह सर्वसामान्यांतून व्यक्त होत आहे.

# धुळ्यातील बनावट खतांचा आ.कुणाल पाटील यांनी मुद्दा मांडला अधिवेशनात

### शेतकऱ्यांना मदतीची मागणी

**धुळे । प्रतिनिधी**

धुळ्यातील बनावट रासायनिक खतामुळे शेतकर्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. कपाशी, बाजरी, ज्वारी, भूईमुग अशा खरीप पिकांवर या रासायनिक खतांचा वापर केल्याने कोणतीही रोगराई दूर झाली नाही. उलट पिकांवर दुष्परीणाम होवून रोगराईचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे धुळे तालुक्यातील आणि जिल्हयातील शेतकरी उध्द्वस्त झाला आहे. बनावट खते व बी-बियाण्यांमुळे फसवणूक झालेल्या शेतकर्यांना शासनाने आर्थिक मदत द्यावी आणि तसा शब्दच कृषी मंत्र्यांनी शेतकर्यांना द्यावा अशी मागणी आ.कुणाल पाटील यांनी आज विधानभवनात केली.त्यामुळे धुळ्यातील बनावट खतांचा मुद्दा आ.कुणाल पाटील यांनी थेट विधानभवनात गाजवल्याने फसवणूक झालेल्या शेतकर्यांना धीर मिळाला आहे.



धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांनी आज दि.१९ जुलै रोजी मुंबईत सुरु असलेल्या पावसाळी अधिवेशनात बनावट रासायनिक खतांचा मुद्दा उचलून सभागृहाचे लक्ष वेधले. पॉईंट ऑफ इन्फार्मेशनव्दारे आ.पाटील यांनी धुळ्यातील बनावट रासायनिक खतांचा मुद्दा मांडला. यावेळी बोलतांना आ.कुणाल पाटील यांनी अधिवेशनात बोलातांना सांगितले कि, धुळे शहरातील अवधान औद्योगिक वसाहतीत बनावट रासायनिक खतांचा साठा कृषी विभागाच्या एका कारवाईत आढळून आला. यामुळे नैसर्गिक संकटाबरोबरच एक नवेच संकट धुळे तालुक्यातील आणि जिल्हयातील शेतकर्यांवर ओढावले आहे. बनावट रासायनिक खतांची विक्री केल्याने असंख्य शेतकर्यांची फसवणूक झाली असून त्यांच्या पिकांवर दुष्परीणाम झाला आहे. बनावट खतांमुळे पिकांची वाढ खुंटली, पानांना गळती लागली, तसेच रोगराईचा प्रादुर्भावही दूर झाला नाही. परिणामी पिकांचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी हवालदिल झाला आहे. दरम्यान महाराष्ट्र बोगस बी-बियाण्याची सर्रास विक्री झाली आहे. त्यामुळे ज्या ज्या शेतकर्यांचे बनावट खते बी-बियाण्यांमुळे नुकसान झाले आहे. अशा शेतकर्यांना शासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी अशी मागणी आ.कुणाल पाटील यांनी विधानभवनात केली. आर्थिक मदतीचा तसा कृषी मंत्र्यांनी आम्हाला व शेतकर्यांना शब्दच द्यावा अशी ठाम मागणी आ.कुणाल पाटील यांनी केली.बनावट खतांचा मुद्दा अधिवेशनात उपस्थित केल्याने फसवणूक झालेल्या शेतकर्यांना दिलासा मिळाला आहे.

# पीएसआय अभिजित इंगळेंचा आज मराठी पत्रकार संघातर्फे सत्कार

**धुळे । प्रतिनिधी**

येथील धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष,माजी सचिव,ज्येष्ठ पत्रकार रविंद्र इंगळे यांचे सुपुत्र अभिजीत इंगळे यांनी महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या पीएसआय पदाच्या दैदीप्यमान यश संपादन केले आहे.

पीएसआयपदी अभिजीत इंगळे यांची निवड झाल्यानंतर त्यांच्यावर सर्वस्तरातुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अभिजीत ज्या भागात राहतात त्या फॉरेस्ट कॉलनीतून त्यांची मिरवणुक काढण्यात आली. सर्वसाधारण कुटूंबातील एका पत्रकाराचा मुलगा आपल्या बुध्दीमत्तेच्या जोरावर एमपीएससीत आपला झेंडा रोवतो याचा स्वाभावीकपणे पत्रसृष्टीलाही अभिमान आहे. त्यामुळेच धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्यावतीने अभिजीत यांचा आज सायंकाळी ५ वाजता



आयकर भवन शेजारी धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या भवनात जाहीर सत्कार केला जाणार आहे. या सोहळ्याला उपस्थितीचे आवाहन पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष विशाल ठाकुर, उपाध्यक्ष मनोज गर्दे, सचिव सचीन बागुल यांनी केले आहे. अभिजित हे धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष, जेष्ठ पत्रकार रवींद्र नामदेव इंगळे यांचे चिरंजीव आहेत. त्यांनी यापूर्वीही स्पर्धा परीक्षांमध्ये अभ्यासावर प्रचंड लक्ष केंद्रित करून यश मिळविले आहे.

# मुसळधार पावसामुळे मुंबई व उपनगरांत हाहाकार

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई शहर व उपनगरांत काल सकाळपासून सुरू असणाऱ्या मुसळधार पावसामुळे चाकरमान्यांची पुरती तारांबळ उडाली आहे. मुंबईची लाईफलाइन समजली जाणारी लोकल सेवा रुळांवर पाणी साचल्यामुळे विस्कळीत झाली आहे. याचा सर्वाधिक फटका मध्य रेल्वेला बसला आहे. ट्रॅकवर पाणी साचल्यामुळे मध्य रेल्वेची वाहतूक डोंबिवली ते कसारा-कर्जपर्यंत पूर्णतः ठप्प झाली आहे.

डोंबिवली दरम्यान लोकल सेवा सुरू आहे. यामुळे मुंबई भागातील सर्वच स्थानकांवर चाकरमान्यांची तुडुंब गर्दी दिसून येत आहे. लोकल सेवा विस्कळीत झाल्याची घोषणा भायखळा रेल्वे स्थानकात केली जात आहे. लांब पल्ल्याच्या गाड्यांनाही पावसाचा फटका बसला आहे. कोल्हापूर-सीएसएमटी गाडी पुण्यात थांबवण्यात आली आहे. तसेच पुणे-सीएसएमटी इंटरसिटी एक्स्प्रेस, पुणे-सीएसएमटी डेक्कन एक्स्प्रेस, पुणे-सीएसएमटी इंद्रायणी एक्स्प्रेस रद्द करण्यात आली आहे. सीएसएमटीहून पुण्याकडे जाणारी सिंहगड एक्स्प्रेसही तूर्त रद्द करण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील पाऊस व पूरस्थितीचा आढावा घेतला. ते म्हणाले की, मी सकाळपासून विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व मुख्य सचिवांच्या संपर्कात आहे. या सर्वांना योग्य त्या सूचना केल्या आहेत. पाऊस जोरात असल्यामुळे एसडीआरएफ, एनडीआरएफ, जिल्हा आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणा आदी सर्वच यंत्रणा अलर्टवर आहेत.

### लोकल सेवा विस्कळीत, चाकरमान्यांचे हाल; मध्य रेल्वेची सेवा डोंबिवलीपर्यंतच



### शाळा, महाविद्यालये बंद

**राज्यात पूरस्थिती उद्भवलेल्या जिल्ह्यांत मदत यंत्रणा तैनात करण्यात आली आहे. खबरदारी म्हणून शाळा व महाविद्यालयेही बंद ठेवण्यात आली आहेत. मंत्रालयातील कर्मचाऱ्यांनाही लवकर सोडण्यात आले आहे, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.**

# जिल्हा परिषदेच्या शाळेत सेवानिवृत्त शिक्षकांची पुर्ननियुक्ती योग्य?

धुळे जिल्हा परिषदेच्या शाळेत सेवानिवृत्त शिक्षकांची कंत्राटी तत्त्वावर अटी, शर्तींच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. या विषयीचे आदेश शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन यांनी शिक्षण आयुक्त, विभागीय आयुक्तांसह जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पाठवले आहे. या निर्णयावर शिक्षक संघटनांनी नाराजी व्यक्त केली.

जिल्हा परिषद तसेच इतरही अनुदानित शाळातील शिक्षकाची कमतरता भरून काढण्यासाठी ७० वर्षाखालील सेवानिवृत्त शिक्षकाची मानधनावर नियुक्ती करण्याचा आदेश शासनाने काढला. यावर विविध बेरोजगार संघटना तसेच काही शिक्षक संघटनांनी निषेध करून विधेयक मागे घेण्यासंबंधी निवेदने देण्यात आली. सदर विधेयकामुळे डी. एड, बी.एड, टी.ई.टी होऊन शिक्षक होण्याचे स्वप्न ज्या शिक्षकांनी आपल्या आयुष्याची ३५ ते ३८ वर्ष घालवून समाजात मानाचे स्थान प्राप्त करून आयुष्याच्या शेवटपर्यंत विद्यार्थ्यांची प्रशंसा मिळविणाऱ्या शिक्षकात अशांतता पसरल्याचे चित्र दिसत आहे. यात सर्वसामान्य बिना फीस भरून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची शिक्षणातून वाद होण्याची प्रक्रिया जाणवत असल्याचा भास होत आहे. शिक्षकांचे नियुक्ती मानधनावर न करता किंवा कंत्राटींना योग्य मानधनांवर नियुक्ती न देता पुन्हा सेवानिवृत्तांना मानधनावर नियुक्ती देणे योग्य ठरणार काय? ज्या शिक्षकांनी शिक्षक व्रत पत्करून इमाने इतरबारे विद्यार्थ्यांसाठी वाहून घेतले. ज्यांना समाजात विद्यार्थ्यांत आपल्या देशाचा प्रभावाने विद्यार्थ्यांना भुरळ पाडली व आता मानसन्मानाने निवृत्तिवेतन होत आहेत. आपल्या कौटुंबिक जीवनात, नातवंडात सन्मानाने जीवन जगत आहेत. जे अगोदर पासूनच विद्यार्थ्यांना व सेवानिवृत्तीनंतरही विनामूल्य योग्य मार्गदर्शन करीत आहेत असे शिक्षक कधीही मानधनावर काम करणार नाही. उलट सदर विधेयकांचा निषेध करतील. मात्र जे शिक्षक शिक्षकी पेशाला दुय्यम समजून आहेत. काहीतरी टांगळमंगळ करून बाहेर व्यवसाय सांभाळणारे, लीडरक्या केल्या तर बऱ्याच शिक्षकांनी नोकरी करत असताना शाळेत कमी वेळ व बाहेर खाजगी शिकविण्या घेऊन जगले असेच घाणीतूनही पैसा उचलणारे सेवानिवृत्त शिक्षकच सदर विधेयकांचे स्वागत करून रुजूही होतील.

### शाळा डबघाईस आल्या

**मागील १० ते १२ वर्षापासून जिल्हा परिषद तसेच अनुदानित शाळांमध्ये शिक्षक तसेच शिक्षक कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीवर बंदी असून दरम्यानच्या काळात अतिरिक्त शिक्षकांचे नियोजन करण्यात आले असतानाही अनेक शासन शाळांत सेवानिवृत्तीनंतर शिक्षकांच्या हजारो जागा रिकाम्या असल्यामुळे विद्यार्थ्यांना जिकरीचे झाले असताना शिक्षक नियुक्त्यांवर बंदी असल्यामुळे भरती करण्यासंबंधी ओरड असतानाही सरळ सेवा भरती केली नाही तर जिल्हा परिषद शाळेत कंत्राटी शिक्षकांची नेमणूक करून काम सुरू असले तरी खाजगी अनुदानित शाळेत शिक्षकांच्या कमतरतेमुळे शाळा डबघाईस आल्या आहेत.**



**नियुक्त्यांना विरोध : सेवानिवृत्त शिक्षकांना रिक्त पदांवर नियुक्ती देण्याच्या शासनाच्या निर्णयाला सध्या जोरदार विरोध होत आहे. सेवानिवृत्त शिक्षकांऐवजी तरुण बेरोजगारांना संधी द्यावी, अशी मागणी अनेक शिक्षक संघटनांसह इतरांनीही केली आहे.**




# वेतनासाठी सिटी लिंकच्या ५०० वाहकांचा संप

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक सिटीलिंक बस सेवा आजही बंद राहणार असून कामगार संघटना आणि प्रशासन यात कोणताही तोडगा निघाला नसल्याने नाशिककरांना हाल सहन करावे लागणार आहेत. ठेकेदारांकडून वाहकांना वेतन दिले जात नाही, दोन महिन्यांचे वेतन रखडल्याने वाहकांनी कामबंद आंदोलन पुकारले आहे. सलग दुसऱ्या दिवशी सिटीलिंक बससेवा बंद असल्याने नाशिककरांचे हाल झाले आहेत.

ठेकेदाराने दोन महिन्यांचे वेतन न दिल्याने नाशिक महापालिकेची परिवहन सेवा असलेल्या सिटीलिंकच्या वाहकांनी कालपासून काम बंद आंदोलन पुकारले असून आजही सलग दुसऱ्या दिवशी सिटीलिंक बससेवा विस्कळीत झाली आहे. काल दिवसभर सिटीलिंक व्यवस्थापन आणि ठेकेदार कंपनीचे अधिकार यांच्या चर्चा होऊ नये, तोडगा निघाला नसल्याने आज पुन्हा चालक वाहक यांनी काम बंद आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. गेल्या दीड वर्षांपासून नाशिक शहरात मनपाच्या माध्यमातून सिटीलिंक बस सेवा सुरु करण्यात आली आहे. मात्र गेल्या पाच सहा महिन्यांपासून पगार वेळेवर मिळावा यासाठी कर्मचाऱ्यांकडून सातत्याने आंदोलनं केली जात आहेत.

## भेटीमुळे संभ्रम

महाराष्ट्राच्या राजकारणात मागील निवडणुकीपासून जे सुरू आहे, त्या पार्श्वभूमीवर अशा उलट-सुलट भूमिका आता चकित करणार्या राहिलेल्या नाहीत!

राष्ट्रवादी काँग्रेसच्या बंडखोर गटाने सलग दोन दिवस पक्षाचे संस्थापक शरद पवार यांची घेतलेली भेट चर्चेचा विषय ठरली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकसंध राहावा, ही आमची इच्छा आहे, भाजपसोबत जाण्याच्या आमच्या भूमिकेला पवारांनी पाठिंबा द्यावा, यासाठी ही भेट घेतल्याचे बंडखोर गटाकडून सांगण्यात आले. अजित पवारांचा पहाटेचा शपथविधी फसला. दुपारच्या शपथविधीने राष्ट्रवादीच्या बंडखोर गटाला वजनदार खाती मिळाली. नेमक्या अशाच वेळी अजित पवार, प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ यांच्यासह सर्व बंडखोर नेते थोरल्या पवारांकडे गेले. आम्हाला मार्गदर्शन करावे, अशी विनंती त्यांनी केली. पवार यांचे आदेश यापुढे आम्हाला बंधनकारक नाहीत, हे अवघ्या काही दिवसांपूर्वी सांगणारे आणि पवारांनी केलेल्या नियुक्त्या बेकायदा ठरवीत नव्याने नियुक्त्या करणारे हेच नेते आहेत. पवार यांना त्यांनी पक्षाध्यक्षपदावरून जूनमध्येच हटविल्याचे बंडखोरीच्या नाट्यानंतर उघड झाले. निवडणूक आयोगाला पाठविल्या गेलेल्या पत्रानुसार आता अजित पवार राष्ट्रवादीचे अध्यक्ष आहेत! बंडखोर गटाला आपल्या पक्षाध्यक्षांऐवजी थोरल्या पवारांचे मार्गदर्शन आवश्यक वाटू लागले! भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतलेले आमदार कायदेशीर मुद्दे उपस्थित होऊन अपात्र ठरु नयेत, यासाठी शरद पवारांच्या मनधरणीचा प्रयत्न असल्याचे म्हटले गेले. त्यात तथ्य नाही. याचे कारण भाजप, शिवसेना शिंदे गटाच्या सरकारमध्ये सामील होण्यापूर्वीच राष्ट्रवादीच्या बंडखोर गटाने आवश्यक ती सर्व खबरदारी घेतली आहे. पक्षाध्यक्षपदी अजित पवार यांची निवड झाली हे दाखविणारे पत्र त्याच तयारीचा भाग. कटुता दूर करण्याचा प्रयत्न, हा या भेटीमागील एक भाग असणे शक्य आहे. मात्र, वयाचा उल्लेख करीत शरद पवार यांना निवृत्तीचा सल्ला देण्यात आला होता.

शरद पवारांपुढे आव्हान

पवार जेथे जेथे सभा घेतील, त्या प्रत्येक ठिकाणी सभा घेतली जाईल, असे बंडखोर गटाकडून जाहीर करण्यात आले. 'विठ्ठला' अशी आळवणी करीत छगन भुजबळ यांनी शरद पवार यांना साकडे घातले. त्याच्या चार-सहा दिवस आधी पवारांनीच शिवसेनेला भाजपपासून दूर केले, असा घणाघात करणारे भुजबळच होते. अर्थात महाराष्ट्राच्या राजकारणात मागील निवडणुकीपासून जे सुरु आहे त्या पार्श्वभूमीवर अशा उलट-सुलट भूमिका आता चकित करणार्या राहिलेल्या नाहीत! भाजपसोबत सरकार स्थापन करणार्या शिंदे गटाबाबत शिवसेना जशी आक्रमक आहे, तशी आक्रमकता राष्ट्रवादीकडून बंडखोरांबद्दल दिसत नाही, हे खरे; पण तो दोन पक्षांच्या कार्यपद्धतीचा फरक आहे. टोकाला न जाता संयत भाषेत प्रतिक्रिया व्यक्त करणे, ही शरद पवार यांची शैली. आम्ही न्यायालयीन लढाईऐवजी लोकांमध्ये जाऊ, ही त्यांची भूमिका याच शैलीचा भाग. 'पक्षाला ज्यांनी धोका दिला, त्यांना आम्ही दाराशी उभे केले नसते' ही संजय राऊत यांची प्रतिक्रिया दोन्ही पक्षांतील फरक दाखविणारी आहे. दोन वेळा भेट घेऊन देखील शरद पवार यांनी बंडखोर गटासमोर कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही, हे लक्षणीय म्हणावे लागेल. पहिल्या दिवशी झालेल्या भेटीत तर त्यांनी घड्याळाकडे निर्देश करीत भेट पुरे, हे सूचित केले. भाजपसोबत येण्याच्या मागणीला प्रतिसाद न देता पवार बंगळुरुतील बैठकीला उपस्थित राहिले. दुसर्या बाजूला उपमुख्यमंत्री अजित पवार राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या बैठकीस गेले. आजघडीला अजित पवार गटाकडेच राष्ट्रवादीचे बहुसंख्य आमदार आहेत. त्यामुळे विरोधकांच्या ऐक्यासाठी आतापर्यंत पुढाकार घेणार्या शरद पवार यांच्यासमोर महाराष्ट्रातील विरोधकांची ताकद आणि ऐक्य कायम ठेवण्याचे आव्हान असेल. राष्ट्रवादी काँग्रेसमधील बंडानंतर विधानसभेतील विरोधी पक्षनेते पदावर काँग्रेस पक्षाने दावा सांगितला आहे. अजित पवार भाजपबरोबर जाण्यापूर्वी महाविकास आघाडीत राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेचा वरचष्मा होता. 'महाराष्ट्रातील जनता काँग्रेसकडेच विरोधी पक्ष म्हणून बघत आहे', अशा आशयाची काँग्रेस नेत्यांची विधाने राष्ट्रवादीच्या शरद पवार गटालाच आव्हान देणारी आहेत. या राजकीय अस्वस्थतेत बंडखोर गटाच्या भेटीने भर टाकली, एवढेच!

# राष्ट्रवादीची अगतिकता...

सन २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीत शिवसेना-भाजपने सरकार स्थापन करावे, असा जनादेश महाराष्ट्राने दिला होता. पण दोन्ही पक्षांत बिनसल्याने अगोदर देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री म्हणून राजभवनात जाऊन शपथ घेतली. ही घटना पहाटेचा शपथविधी म्हणून नोंदवली गेली. देवेंद्र आणि अजितदादा यांचे सरकार जेमतेम ८० तास टिकले होते. अहोरात्र ब्रेकिंग न्यूज देणाऱ्या माध्यमांना हा पहाटेचा शपथविधी अगोदर समजला नव्हता आणि त्यांचा संसार जेमतेम तीन दिवस चालेल, असेही कोणी भविष्य वर्तवले नव्हते.



राज्यात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन होणार आणि उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होणार याचेही कुणाला स्वप्न पडले नव्हते. महाविकास आघाडीचे शिल्पकार शरद पवार यांनी उद्धव यांना मुख्यमंत्रीपदाचे आमिष दाखवले. खरे तर, सर्वात मोठ्या पक्षाचे नेते म्हणून फडणवीस हे मुख्यमंत्रीपदाचे दावेदार होते व तेच मुख्यमंत्री होतील, असे गृहित धरून जनतेने मतदान केले होते. पण उद्धव ठाकरे हे अचानक मुख्यमंत्री होतील याची माध्यमांना कल्पना नव्हती. अडीच वर्षांच्या काळात उद्धव यांच्या विरोधात पक्षात आमदारांमध्ये मोठी खदखद असतानाही एकाही माध्यमाने शिवसेनेत मोठा असंतोष, अशा ब्रेकिंग दिल्या नव्हत्या. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली ४० आमदार मुंबईहून सुरतकडे रवाना होईपर्यंत माध्यमांना त्यांनी केलेला उठाव ठाऊक नव्हता. शिंदे गट आणि भाजप यांनी सरकार स्थापनेचा दावा केला तेव्हा एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री होतील, हेही कुणाला ठाऊक नव्हते. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये देवेंद्र यांना उपमुख्यमंत्री म्हणून काम करण्याची वेळ येईल अशी कोणी कल्पनाही केली नव्हती. महाआघाडी सरकारमध्ये उपमुख्यमंत्री म्हणून वावरलेले अजित पवार हे राष्ट्रवादीत समाधानी नाहीत, काकांकडून त्यांच्या कन्येला झुकते माप दिले जाते, अशा बातम्या अधून मधून येत होत्या. पण एकनाथ शिंदे यांच्या धर्तीवर अजित पवार हे ४० आमदारांची फौज घेऊन बाहेर पडतील व काकांना मागे ठेऊन भाजपसोबत सरकारमध्ये सामील होतील याचीही २ जुलैच्या सकाळपर्यंत माध्यमांना कल्पना नव्हती.

दिवसभर महाराष्ट्राचे राजकारण चर्वण करणाऱ्या व तेच तेच चेहरे व तीच दृश्ये सकाळपासून रात्रीपर्यंत वारंवार दाखविणाऱ्या माध्यमांना आणि पत्रकारांना प्रत्यक्षात काय घडत होते याचा अंदाज आला नाही आणि तशी शोध पत्रकारिता कुठे दिसलीही नाही. देवेंद्र फडणवीस पत्रकारांना म्हणाले, तुम्हाला जे माहिती आहे, त्यापेक्षा प्रत्यक्षात वेगळे घडत असते राष्ट्रवादीमधील अजित पवारांचा गट दोन आठवड्यापूर्वी शिंदे- फडणवीस सरकारमध्ये सामील झाला. राष्ट्रवादीच्या नऊ मंत्र्यांचा शपथविधी झाला. अजित पवार हे पाचव्यांदा राज्याचे उपमुख्यमंत्री झाले. त्यांना मनासारखे अर्थ व नियोजन हे अतिशय शक्तिशाली खाते मिळाले असले तरी ते उपमुख्यमंत्रीपदावर राहण्यासाठी भाजपसोबत आलेले नाहीत. ते महत्त्वाकांक्षी आहेत. राष्ट्रवादीत राहून आपण मुख्यमंत्री होणार नाही हे त्यांना कळून चुकले आहे. त्यामुळे या पदावर ते किती दिवस शांत राहतील, हे कोणीच सांगू शकत नाही. प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, धनंजय मुंडे, हसन मुश्रीफ, आदिती तटकरे, अनिल पाटील असे काकांचे निष्ठावान निकटवर्तीय भाजपसोबत आले आहेत. त्यातील अनेकजण केंद्रीय चौकशी यंत्रणांच्या रडारवर आहेत. भाजपबरोबर सरकारमध्ये जाण्यासाठी काकांनी गेल्या नऊ वर्षांत पाच वेळा चर्चा केल्या पण त्या सफल झाल्या नाहीत. जर आपण शिवसेनेसोबत सरकारमध्ये जाऊ शकतो मग भाजपसोबत का नाही, असा या मंडळींचा बिनतोड सवाल काकांना आहे

राष्ट्रवादी काँग्रेसमधील अजितदादांचा गट सरकारमध्ये सामील झाल्यापासून कोणीच आनंदी दिसत नाही. सर्वांचे चेहरे पडलेले किंवा गंभीर दिसत आहेत. सर्वांच्या देहबोलीवरून प्रत्येकजण दडपणाखाली आहे असे दिसते. कोणी मनमोकळेपणाने बोलत नाही. आपण काकांना मागे ठेऊन भाजपसोबत आलो पण आपले पुढे काय होणार, याची चिंता या सर्वांना आहे. या सर्वांना बोट धरून काकांनी सत्तेवर बसवले, हे ते विसरू शकत नाहीत. राष्ट्रवादी भाजपसोबत आली म्हणून राज्यात कुठे जल्लोश साजरा झाला नाही. मिठाई वाटतानाची दृश्ये पडद्यावर दिसली नाहीत. ज्यांनी भाजपवर व मोदी-शहांवर सतत दुगाण्या झाडल्या, ज्यांनी भाजप नको म्हणून उद्धव ठाकरेंच्या मस्तकावर मुख्यमंत्रीपदाचा मुकुट चढवला, सन २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत कोणत्याही परिस्थितीत केंद्रात भाजप सत्तेवर येता कामा नये, म्हणून 'मोदी हटाव' मोहीम सुरू केली, त्या पक्षाच्या ४० आमदारांना भाजपचे आकर्षण का वाटावे? राज्यात ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाआघाडीचे सरकार स्थापन झाले, तेव्हा जनतेचा जनादेश होता कुणाला व सरकार कोणी बनवले अशी चर्चा झाली. राज्यातील मतदारांनी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या विरोधात मतदान केले आहे, त्यांना विरोधी पक्षात बसण्याचा आदेश दिला आहे, मग वारंवार हे पक्ष सत्तेच्या परिघात येण्यासाठी का धडपडत आहेत? राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन होऊन पंचवीस वर्षे झाली. पण सत्तेशिवाय हा पक्ष राहू शकत नाही

शिंदे-फडणवीस सरकार गेल्या वर्षी महाराष्ट्रात सत्तेवर आल्यानंतर आता जनतेच्या मनातील शिवसेना-भाजप युतीचे सरकार आले असे स्वत: शिंदे व फडणवीस जाहीरपणे प्रत्येक सभेत सांगत होते. डबल इंजिन सरकारचा शिंदे-फडणवीस अभिमानाने उल्लेख करीत होते. आता टिबल इंजिनबाबत लोक रस्त्यावर, बसमध्ये, लोकल ट्रेनमध्ये, एसटी बसमध्ये, बाजारात, ज्येष्ठ नागरिक संघात, महिला मंडळात काय बोलतात, हे ऐकायला कुणाला वेळ आहे का? भाजपचे कार्यकर्ते व संघ परिवारातील लोकांच्या मनात काय वेदना आहेत, हे सत्तेवर बसलेल्यांना ठाऊक आहे का? पत्रकारांना आणि माध्यमांना काहीच पडलेली नसते. जे सत्तेवर असतात, त्यांच्यावर दिवसभर कॅमेरे फिरत असतात. त्यांची भाषणे आणि विकासाच्या गप्पांना प्रसिद्धी दिली जाते. महाराष्ट्राच्या राजकारणात कुणावर विश्वास ठेवायचा, असा प्रश्न सर्वसामान्य लोक विचारत आहेत. अहो, आम्ही एकदाच मतदान केले; पण सर्व राजकीय पक्ष सरकारमध्ये आले. एकदा मतदान केल्यावर अजित पवारांनी चार वर्षांत तीन वेळा उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली, या घटनेची गिनीज बुकमध्ये नोंद होईल, असे गप्पांचे फड रंगत आहेत. मुख्यमंत्री शिवसेनेचा, एक उपमुख्यमंत्री भाजपचा व दुसरा उपमुख्यमंत्री राष्ट्रवादी काँग्रेसचा. राज्याला दोन उपमुख्यमंत्री देण्याचा इतिहास महायुतीने घडवला.

एकनाथ शिंदे गट भाजपसोबत आला तेव्हा हिंदुत्वाचा जप करीत आला. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांचे नाव घेत शिंदे भाजपसोबत आले. अजित पवार मात्र राज्याच्या विकासासाठी आलो असे सांगत आहेत. महाआघाडी सरकारमध्ये अजित पवार अर्थमंत्री असताना ते शिवसेना आमदारांना निधी देत नव्हते. शिवसेनेला संपवण्याचा प्रयत्न करीत होते, असे आरोप करून शिंदे गटाने उद्धव विरोधात उठाव केला होता. आता अजितदादा उपमुख्यमंत्री म्हणून विधानसभेत पहिल्या रांगेत शिंदेंच्या शेजारी दिसू लागले आहेत. अजितदादा गट भाजपसोबत आल्याने त्यांना त्याची किंमत द्यावी लागली. शिंदेंना मुख्यमंत्री केल्यानंतर उबाठा सेना खिळखिळी झाली तसे अजितदादांना उपमुख्यमंत्री केल्याने राष्ट्रवादी काँग्रेस खच्ची होईल का, हा लाख मोलाचा प्रश्न आहे. शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन प्रादेशिक पक्ष एका वर्षात दुभंगले, दोन्ही पक्षात उभी फूट पडली, हे भाजपला किती लाभकारक ठरते, हे २०२४ च्या निवडणुकीत कळून येईल. पण बंड करायचे, काकांवर आगपाखड करायची, काका भाजपबरोबर कसे सूत जमवत होते ते उघड करायचे आणि सरकारमध्ये सामील झाल्यावर साहेब आमचे दैवत आहेत, असे म्हणत त्यांच्याकडे जायचे, आपण सर्व एकत्र राहू या असे म्हणायचे, आशीर्वाद मागायचे, त्यांच्या पाया पडायचे जर बंडखोरांच्या दैवताला भाजपबरोबर जाणे मान्य नाही, मग बंडखोरांची नौटंकी कशासाठी? काका मोदी विरोधकांबरोबर बंगळूरुला आणि पुतण्या मोदींबरोबर दिल्लीला, असे चित्र देशाला दिसले. कोण कोणाला फसवत आहे, लोक संभ्रमात आहेत.

**- इंडिया कॉलिंग : डॉ. सुकृत खांडेकर**

## 'ग्रीन कोर्ट' आणि 'ई कोर्ट'चे कवित्व

भारतीय न्यायालयांमध्ये दररोज लाखो खटल्यांची सुनावणी होत असताना मोठ्या प्रमाणात कागद वापरले जातात. म्हणूनच सर्वोच्च न्यायालयात तीन पेपरलेस ग्रीन कोर्ट रूम सुरू करणे हा तंत्रज्ञानाच्या हुकमी वापरासाठी सकारात्मक उपक्रम ठरला. दरम्यान, व्हीडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयीन सुनावणीला वैधता प्रदान केली गेली. यामुळे न्यायालयीन कारभारात गती येणार आहे. मात्र याची संख्या आणि कामाचे प्रमाण वाढवायला हवे.

ब्रिटिशकाळात सुरू करण्यात आलेल्या न्यायव्यवस्थेत कालानुरूप काही बदल झाले. न्यायव्यवस्था स्वतंत्र असली, तरी काही बाबतीत तिला सरकारवर अवलंबून राहावे लागते. विशेषतः न्यायाधीशांच्या नियुक्त्या, पायाभूत सुविधा आदींसाठी सरकारनेच तरतूद करावी लागते. सरकारने हात आखडता घेतला की, न्यायालयाच्या कामकाजावर परिणाम होतो. न्यायालयात चार कोटी ३२ लाखांहून जास्त खटले प्रलंबित आहेत. दोन महिन्यांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाने जास्त खटले प्रलंबित राहण्यास सरकार कसे जबाबदार आहे, हे स्पष्ट केले होते. काही घटनांनंतर समाजमन पेटून उठल्यानंतर काही सुधारणा करण्यात आला. महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे जलदगती न्यायालयात चालवायला सुरुवात झाली. न्यायालयीन कामकाजात कृत्रिम बुद्धिमतेचा वापर करण्याबाबत एकीकडे विचार सुरू असताना दुसरीकडे अन्य आधुनिक तंत्रप्रणालीचा न्यायालयीन कामकाजात वापर केला जात आहे. संगणक, व्हीडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आरोपींची सुनावणी आदी प्रकार सुरू झाले आहेत. असे असले, तरी सर्वोच्च न्यायालयात ६९ हजारांहून अधिक प्रकरणे प्रलंबित आहेत, तर देशातील २५ उच्च न्यायालयांमध्ये ५९ लाखांहून अधिक प्रकरणे प्रलंबित आहेत. राज्यसभेत सरकारने दिलेल्या आकडेवारीनुसार, देशाच्या विविध न्यायालयांमध्ये प्रलंबित प्रकरणांची संख्या वाढत असून अधीनस्थ न्यायालयांमध्ये ४.३२ कोटींहून अधिक प्रकरणे प्रलंबित आहेत. यापैकी दहा लाख तीस हजार लाख खटले अलाहाबाद उच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. सिक्कीम उच्च न्यायालयात सर्वात कमी १७१ खटले अप्रलंबित आहेत.


देशभरातील विविध न्यायालयांमध्ये चार लाखांहून अधिक प्रकरणे २५ वर्षांहून अधिक काळ प्रलंबित आहेत. गेल्या डिसेंबरमध्ये एका कार्यक्रमात या आकडेवारीचा दाखला देत सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड म्हणाले होते की, लोकांनी जिल्हा न्यायालयांना गौण न्यायपालिका मानण्याच्या मानसिकतेपासून मुक्त व्हावे. जिल्हा न्यायालये केवळ न्यायव्यवस्थेचा कणा नसून अनेकांची सेवाही करतात. 'एनजेडीजी'च्या डेटानुसार, वकिलांच्या अनुपलब्धतेमुळे ६३ लाखांहून अधिक प्रकरणे प्रलंबित आहेत. न्यायालये पुरेशा क्षमतेने चालतील याची खात्री करण्यासाठी वकिलांच्या सहकार्याच्या गरजेवर न्या. चंद्रचूड यांनी भर दिला होता. याच महिन्यात सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओका यांनी न्यायालयांमधील प्रलंबित खटल्यांचा संदर्भ देत भारताला प्रति दशलक्ष लोकांमागे ५० न्यायाधीशांची गरज आहे; परंतु सध्या हा आकडा प्रति दशलक्ष केवळ २१ आहे; त्यामुळे न्यायालयांमधील खटल्यांचे प्रलंबित प्रमाण वाढले आहे, असे सांगितले. याचा अर्थ आपल्याकडे गरजेच्या निम्मेही न्यायाधीश नाहीत. त्यामुळे उपलब्ध न्यायमूर्तींवर कामाचा ताण येतो.

भारतीय न्यायालयांमध्ये दररोज लाखो खटल्यांची सुनावणी होते आणि प्रत्येक प्रकरणाशी शेकडो कागदपत्रे जोडलेली असतात. या संपूर्ण प्रक्रियेत किती कागद वापरले गेले असतील याचा अंदाज बांधता येतो. न्यायालये पेपरलेस करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून सर्वोच्च न्यायालयात तीन पेपरलेस ग्रीन कोर्ट रूम सुरू करणे हा तंत्रज्ञानाच्या अधिक चांगल्या वापरासाठी सकारात्मक उपक्रम म्हटला जाईल. आता तिथे ना फायलींचा ढीग असेल, ना वकील आणि न्यायाधीशांना उदाहरणे वाचण्यासाठी पुस्तकांची पाने उलटावी लागतील.

**क्रमशः**

**- खास बात : शिवाजी कराळे, विधिज्ञ**

## शब्दकोडे-१२५



आडवे शब्द

१. सिंह ३. भडीमार ६. महालक्ष्मीची नगरी ७. सारखे खाण्याची इच्छा ८. नवरदेव ९. लाडवाचा शाही प्रकार १०. निवासस्थान ११. दरोडेखोर १२. आनंदावर पडल्यास मनोभंग १४. सर्प १६. सकस १८. अतिमहत्त्वाच्या व्यक्तींवरबरोबर आलेला फौजफाटा २१. प्रत्युत्तर २४. विष्णूपत्नी २५. हवेतील शीतलता २७. वैरी, दावा दाखल करणारा २८. फटाक्यांत ठासली जाणारी २९. दुसऱ्यावर केलेले उपकार ३०. विनिमयाचे देशानुसार बदलणारे साधन ३२. नेस्तनाबूत ३३. पांग, मेहरबानी ३५. अगदी नियमित ३८. दगा, हानी ४०. कवितेतील एक शब्दालंकार ४१. ही केवळ 'र' ला 'ट' जुळवल्याने होत नाही! ४४. बारीकसारीक ४७. शरम ४९. उलटीपूर्वीची अवस्था ५१. आवडता, प्रिय ५२. गवत कापण्याचे, उपटण्याचे साधन ५५. दुमड घातलेली करंजी ५८. कुरकूर, अतिश्रम ५९. ध्यान लावणारा पक्षी ६१. देवालयातील गाभारा भरून टाकणारा आवाज ६२. वेळी-अवेळी, रात्री-अपरात्री ६४. गव्हाचे बारीक पीठ ६५. नाश्तापाणी ६६. आरतीसाठीचे वाद्य ६७. पुरुषश्रेष्ठ ६८. लक्ष्मीनारायण

उभे शब्द

१. पिवळसर रंगाचे काटेरी सुगंधी पान २. मंत्रीमंडळ ३. महाशिरात्रीचा महिना ४. सीतेला पळवून नेणारा ५. अफूचे बी ६. कारल्याची चव ६अ. नैसर्गिक भुयार ७. हिंदीत खत ७अ. आचारी ९. रात्रभर १०. हल्ली हे दिवस केवळ गोंगाट आणि खरेदीचे! १३. पाणी १५. समाजातील प्रतिष्ठा १६. थडगे १७. रक्त देणे १९. सैन्यातील एक हुद्दा २०. किल्लीचा जोडीदार २१. विविध प्रकाराने २२. जागृत २३. अर्थसंकल्प २६. लायब्ररी (मराठी) ३१. केसांची बट ३४. आकाशपोकळी ३५. शेवट करणे, तडीस नेणे (वा.प्र.) ३६. विचार, हेतू ३७. सौनग वठवणारा ३९. सावकार, श्रीमंत ४२. निर्मळ ४३. हा सगळ्यांनीच सोडल्यास बेबंदशाही! ४५. अस्थि ४६. सततचे नाकारणे ४८. लोक, प्रजा ५०. औरंगाबादची प्रसिद्ध वास्तु- 'बीबी का ----' ५३. मृत्यूचा राजा ५४. तारणारा ५६. केशकर्तनालयातील साधन ५७. शाश्वत ६०. कातरलेले तुकडे ६३. शिवाय, वाचून ६४. चालू दिवस ६५. स्वाद, रूची ६५अ. रचल्यास ढीग

### शब्दकोडे १२४ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.शिकागो ४.नमनाला घडाभर तेल १३.लंगर १४.मदन १५.रोकड १६.जलाशय १७.गदगदणे १९.कडबा २१.भुंगा २३.रीम २५.नाजायज २७.मास २८.आंबट २९.वासरु ३१.रामायण ३२.साद ३३.कलत्र ३५.मानव ३६.देव ३८.कणकण ४०.हरीण ४१.प्रेशर ४२.काबाडकष्ट ४३.दरदाम ४६.नीरव ४८.वरदान ४९.कार ५०.बल ५१.जान ५३.बकध्यान ५५.पैठणी ५६.सेकंद ५७.भकास ५९.पै ६०.कलप ६१.राठ ६५.साम ६६.दमा ६८.भित्यापाठी ब्रह्मराक्षस ७२.रन ७३.साधक ७४.म्हण ७५.हरकत ७८.बाबा ८०.वचा ८१.व ८२.वासर ८३.वाह ८४.जवळीक ८५.धुरीण ८६.मोसम ८७.आनन

**उभे उत्तर**

१.शिलंगण २.कागद ३.गोरगीब ४.नमणे ५.मद ६.नानक ७.घरोबा ८.डाक ९.भडभुंजा १०.तेज ११.ललाट १२.कायरस १८.दमट २०.डमरु २२.गायरान २४.सवालजबाब २५.नाद २६.जमाव २७.माणदेश २८.आंदण ३०.सत्र ३२.साकव ३४.अरीष्ट ३७.वरकरणी ३९.कसर ४०.हकनाक ४१.प्रेम ४३.दर ४४.रदाळ ४५.दान ४६.नीलकंठ ४७.वजा ४८.वन ४९.काठपदर ५०.बसेरा ५२.नभ ५३.बस ५४.ध्यास ५५.पैल ५८.कामाठी ६०.कमलाकर ६२.भुत्या ६३.ता!ण ६४.साक्ष ६७.मनमोहन ६८.भिकबळी ६९.पान ७०.ब्रह्मचारी ७१.सहवास ७३.सावज ७६.रसम ७७.लोचन ७९.बाक ८०.वधू ८३.वान

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# मनसे महिला आघाडीतर्फे महापालिकेला निवेदन

**नाशिक । प्रतिनिधी**



महाराष्ट्र नवनिर्माण महिला सेनेच्या मनसे पूर्वविभाग अध्यक्ष कविता कुलकर्णी यांच्यातर्फे प्रभाग क्रमांक ४ च्यावतीने विविध समस्यांसंदर्भात महापालिका प्रशासनाला मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे.

प्रभाग क्रमांक ४ मध्ये अनेक समस्यांनी ठाण मांडले असून महापालिका प्रशासन जबाबदारीकडे डोळेझाक करीत आहे असा आरोप करण्यात आला आहे. याची दखल घेण्यासाठी विभागीय अधिकारी योगेश रकटे यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात वज्रेश्वरी कॅनॉल लगत असलेला कचरा व मृत जनावरांची दुर्गंधी परिसरात पसरली असून लगतच्या रहिवाशांना त्याचा त्रास होत आहे. तसेच डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने देखील आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे, त्यासाठी धूर फवारणीची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. याप्रसंगी प्रभागातील नागरिकांनी सहीचे निवेदन तयार करून कविता कुलकर्णी यांच्याकडे देत पाठपुरावा करण्याची मागणी केली होती. याप्रसंगी शहराध्यक्ष दिलीप दातीर, पूर्व विभाग अध्यक्ष भाऊसाहेब निमसे यांच्या वतीने पाठपुरावा करण्यात आला. त्या अनुषंगाने विभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी रेखा तडाके, दर्शना जोशी, सुनीता सोनवणे, शाखाध्यक्ष हर्षल कुलकर्णी आदी प्रभागातील नागरिक व महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

# नाशिक जिपचे प्रदीप अहिरे यांना राज्य शासनाचा गुणवंत कर्मचारी पुरस्कार

**नाशिक । प्रतिनिधी**

ग्राम विकास विभागांतर्गत राज्य शासनाच्या तसेच पुरस्कृत अनेक योजना व प्रकल्प राबविले जातात. अशा काही योजना प्रकल्प राबवितांना संबंधित अधिकारी तसेच कर्मचाऱ्याचे प्रशासकीय तसेच तांत्रिक कौशल्य पणाला लागते. असे प्रकल्प पूर्ण करताना अधिकारी, कर्मचाऱ्यांमध्ये विशेष वैयक्तिक कौशल्य व गुणवत्ता आढळून येत असते.

अशा अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा गौरव करण्याची योजना शासनाने ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, दिनांक २ सप्टेंबर २००५ अन्वये सन २००५-२००६ पासून सुरु केली आहे. त्यानुषंगाने सन २०२०-२०२१ यावर्षी ग्रामविकास विभागात मंत्रालयातील (खुद) व क्षेत्रिय स्तरावरील गुणवंत अधिकारी कर्मचारी पुरस्कारांची घोषणा ग्रामविकास विभागाच्या वतीने करण्यात आली आहे.



नाशिक जिल्हा परिषदेतील वरिष्ठ सहायक प्रदीप अहिरे यांची निवड गुणवंत कर्मचारी म्हणून करण्यात आली आहे.

नाशिक जिल्हा परिषदेत कार्यरत असताना त्यांनी राष्ट्रीय पेयजल योजनेत उत्कृष्ट काम केले आहे. प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना कार्यालयात देखील त्यांनी काम केले असून जिल्हा परिषदेच्या नूतन इमारतीची निविदा प्रक्रिया यशस्वीरित्या राबवली. जिल्हा परिषदेच्या नूतन इमारतीची रचना बघता निविदा प्रक्रिया राबवताना अनेक प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागले. त्यातच ही निविदा राबवताना प्रदीप अहिरे यांना करोनाची लागण झाली होती. परंतु अशा परिस्थितीत देखील त्यांनी काम करत यशस्वीरीत्या ही निविदा प्रक्रिया राबवली. जिल्हा परिषदेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांमध्ये अहिरे यांचा सहभाग असतो.

सद्यस्थितीत प्रदीप अहिरे हे पंचायत समिती इगतपुरी येथील शिक्षण विभागात कार्यरत असून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, पंचायत समिती इगतपुरीच्या गट विकास अधिकारी डॉ. लता गायकवाड यांनी गुणवंत पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल प्रदीप अहिरे यांचे अभिनंदन केले आहे.

# सायकल चलाओ, स्वास्थ बढाओ' मोहिमेचा प्रारंभ



**नाशिक । प्रतिनिधी**

वाढती रहदारी, वाढते ध्वनी आणि वायू प्रदुषण, वाढते अपघात, यातून नाशिककरांना मुक्ती मिळावी यासाठी जास्तीत-जास्त नाशिककरांनी सायकलचा वापर करावा म्हणून रेल्वे डाक सेवेचे कर्मचारी रत्नाकर शेजवळ यांनी 'सायकल चलाओ स्वास्थ बढाओ' हा संदेश देत सायकल रॅली सुरू केली आहे.

त्यांना याप्रसंगी शुभेच्छा देताना रेल्वे डाक सेवेतील कर्मचारी उप अभिलेख अधिकारी, निलिमा शिरोडे, प्रतिभा जमदाढे, वर्षा हर्डिकर, श्रीकांत महाजन, फिरोज तडवी व कर्मचारी उपस्थित होते. रत्नाकर शेजवळ हे गरूडझेपचे डा. संदीप भानोसे यांच्या मार्गदर्शनाखाली जनजागृती करीत असल्याने गरूडझेप परिवाराकडून देखील त्यांना या मोहीमेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# २१ जुलैला उडणार 'अफलातून' धमाल

**नाशिक । प्रतिनिधी**




जी गोष्ट आपल्याकडे नाही ती आपल्याला हवीशी वाटणं साहजिक आहे. पण त्याची खंत न करता नसलेल्या गोष्टीला आपली ताकद बनवून तीन जिवलग डिटेक्टिव्ह मित्र एका प्रकरणाचा छडा कशा मजेशीर प्रकारे लावतात याची धमाल दाखवणारा 'अफलातून' हा मराठी चित्रपट येत्या २१ जुलैला प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. अशी माहिती सिद्धार्थ जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी अभिनेत्री श्वेता गुलाटी, तेजस्विनी लोणारी यांनीही पत्रकारांशी संवाद साधला.

साहा अँड सन्स स्टुडिओज, आयडियाज द एंटरटेन्मेन्ट कंपनी आणि राजीव कुमार साहा, चित्रपटाचे निर्माते आहेत. ग्रुप एम मोशन एंटरटेन्मेन्ट, अवधूत डिस्ट्रिब्युटर आणि स्वर्ण पट कथा यांच्या संयुक्त विद्यमाने 'अफलातून' चित्रपटाची सहनिर्मिती करण्यात आली आहे. 'पेईंग गेस्ट', 'धमाल', 'ऑल द बेस्ट', 'पोस्टरबॉईज', 'टोटल धमाल' या हिंदी चित्रपटांच्या लेखनासोबतच टिव्ही मालिका, नाटकांसाठी लेखन, निर्मिती आणि दिग्दर्शन करणाऱ्या परितोष पेंटर यांच्या दिग्दर्शनाखाली हा चित्रपट तयार झाला आहे.

डिटेक्टिव्ह म्हणून काहीतरी वेगळे करू इच्छिणारे तीन मित्र. त्यातल्या एकाला बघता येत नाही, एकाला ऐकू येत नाही आणि एक बोलू शकत नाही. त्यांच्यातील या कमतरतेमुळे त्यांची नेहमीच फटफजिती होते. मात्र ते डगमगत नाहीत तर परिस्थितीला सामोरे जात एकत्र उभे ठाकतात. आपल्यातील ही मैत्री जपत एका फसवणुकीचा हे तीन मित्र कसा निकाल लावतात? याची धमाल दाखविणारा 'अफलातून' चित्रपट प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी सज्ज झालाय.

# भाजपा मध्य मंडलाची टिफिन बैठक संपन्न



**नाशिक । प्रतिनिधी**

मोदी९ या कार्यक्रमांतर्गत मंडलाच्या टिफिन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी शहराध्यक्ष गिरीश पालवे, प्रदेश प्रवक्ता लक्ष्मण सावजी, मंडल अध्यक्ष देवदत्त जोशी, सरचिटणीस वसंत उशीर, प्रतिक शुक्ल यांच्या प्रमुख उपस्थितीत टिफिन बैठक प्रसाद मंगल कार्यालय येथे संपन्न झाली.

भारतीय जनता पक्ष रुजवण्यात ज्या नेत्यांनी अनेकदा खस्ता खाल्ल्या अशा सर्व मान्यवरांचे स्मरण यावेळी करण्यात आले. या बैठकीत घर चलो अभियान. घर जोडो अभियान ..मोठ्या प्रमाणावर करण्याचे आयोजन करण्यात आले. तसेच २०२४ मध्ये जास्तीत जास्त भाजपाचे खासदार निवडून आणण्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आला. यावेळी महेश हिरे, सुरेश पाटील, स्वाती भामरे, अनिल भालेराव, वर्षा भालेराव, नंदकुमार देसाई, प्रदीप पाटील, सुषमा गोराणे, रोहिणी रकटे, सोनाल दगडे, पूर्वा सावजी, सोनाली जोशी, निखिल पवार, दिनेश जाधव, संगीता जाधव, मोहन गायधनी, प्रसाद धोपावकर, महेश सदावर्ते, पंकज भुजंग, अमोल गांगुर्डे, चित्रेश वस्पटे, तुषार देवरे, विनोद येवलेकर, आदित्य केळकर, बबलू परदेशी, संजय परदेशी, ऋषिकेश ढापसे, ऋषिकेश ठाणगावकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# नाशिकचे नेमबाज संदीप पवार व अद्वैत जोशी भारतीय क्रिडा प्राधिकरण अंतर्गत अधिकृत प्रशिक्षक




**नाशिक । प्रतिनिधी**

भारतीय क्रीडा प्राधिकरण पटियाला अंतर्गत दिल्ली येथे पार पडलेल्या प्रशिक्षकांच्या प्रशिक्षण अभ्यास केंद्रात नाशिकचे नेमबाज व प्रशिक्षक संदीप पवार यांनी ३०० पैकी २१४ व अद्वैत जोशी यांनी ३०० पैकी २१० गुण प्राप्त करून यशस्वीरित्या ही कठीण परीक्षा 'अ' श्रेणीने उत्तीर्ण झाले असुन दोघांनाही नेमबाजीचे अधिकृत प्रशिक्षक म्हणून प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

# जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेत सहभागी व्हावे : जिल्हाधिकारी गंगाथरन डी.

**नाशिक । प्रतिनिधी**




प्रधानमंत्री पीक विमा योजनेत शेतकऱ्यांना सहभागी होण्यासाठी शासनाने ३१ जुलै २०२३ मुदत दिली आहे. परंतु शेतकऱ्यांनी शेवटच्या तारखेपर्यंत वाट न पाहता तातडीने पीक विमा योजनेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी गंगाथरन डी. यांनी केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात कृषि विभाग व ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी यांच्या मार्फत जनजागृतीसाठी तयार करण्यात आलेल्या पीक विमा रथास हिरवा झेंडा दाखविला.

याप्रसंगी अतिरिक्त जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ, उपजिल्हाधिकारी रोहयो नितिन मुंडावरे, उपजिल्हाधिकारी निवडणूक शशिकांत मंगरूळे, उपजिल्हाधिकारी भिमराज दराडे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी विवेक सोनवणे, कृषी उपसंचालक जगदिश पाटील, तहसिलदार परमेश्वर कासोळे, कैलास पवार आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी गंगाथरन डी. म्हणाले, बदलत्या नैसर्गिक हवामानापासून शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी पंतप्रधान पीक विमा योजना मदतीची आहे. यासाठी शेतकऱ्यांना www.pmfby.gov.in या संकेतस्थळावर अथवा नजीकच्या CSC किंवा VCC सेंटरवर जाऊन केवळ एक रूपया विमा हप्ता भरून योजनेत सहभागी होता येणार आहे. उर्वरित रक्कम विमा कंपनीस शासनामार्फत अदा केली जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी गंगाथरन डी. यांनी यावेळी दिली.

## लासलगाव येथे डॉ अण्णाभाऊ साठे पुण्यतिथी साजरी

**लासलगाव ।** लासलगाव येथील एकता ग्रुप राजवाडा यांच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या ५४ व्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन सभा घेण्यात आली. याप्रसंगी ग्रुप चे उपाध्यक्ष वैभव शेजवळ यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले तसेच आण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष चांगदेव त्रिभुवन,उपाध्यक्ष निखिल विस्ते व विकी त्रिभुवन यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

# ब्राम्हण समाजातर्फे गुणवंत विद्यार्थीनींचा सत्कार

**लासलगाव । प्रतिनिधी**

येथील श्री जैन प्राथमिक विद्या मंदिर शाळेची विद्यार्थीनीने आंतरराष्ट्रीय सायन्स ओलंम्पियाड स्पर्धेत महाराष्ट्रात २४ वा क्रमांक पटकावला तर श्री महावीर शाळेची विद्यार्थीनी मोक्षदा भंडारी हिने स्कॉलरशिप एनएमएमएस स्पर्धेत नाशिक जिल्ह्यात ३७ क्रमांक मिळवला तर क्षिती जोशी हिने हस्ताक्षर स्पर्धेत यश संपादन केल्या बद्दल ब्राह्मण समाजा तर्फे तथा मैत्रेयी महिला मंडळ तर्फे या तिघी यशस्वी विद्यार्थीनींच्या सत्काराचा कार्यक्रम स्मिता कुलकर्णी आणि अक्षदा जोशी यांच्या नेतृत्वात श्रीराम मंदिर येथे आयोजित करण्यात आला होता शाळेसोबतच ब्राह्मण समाजाचे नाव लौकिक वाढवला त्या बद्दल या यशस्वी विद्यार्थ्यानींचे अभिनंदन करण्यात आले.



या विद्यार्थ्यीनींनी जे घवघवीत यश मिळवले,शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आणि ब्राह्मण समाजाचा देखील नावलौकिक वाढवला त्याबद्दल ब्राह्मण समाजाला त्यांचे कौतुक आहे. नुकताच अधिक मास सुरू झाला आहे या विद्यार्थीनींप्रमाणेच सर्व विद्यार्थ्यांनी अभ्यासात आणि स्पर्धा परीक्षेत अधिकाधिक यश संपादन करावे. शाळेबरोबरच ब्राह्मण समाजाचा आणि आपल्या आई वडीलांचा नावलौकिक वाढवावा,संघटना वेळोवेळी याची दखल घेऊन भविष्यातील स्पर्धेसाठी शुभेच्छा देईल असे आश्वासन ब्राह्मण महासंघ विश्वस्त तसेच मैत्रेयी महिला मंडळ अध्यक्ष स्मिता कुलकर्णी यांनी दिले.

ब्राह्मण सेवा मंडळ अध्यक्ष विजय जोशी यांनी मनोगत व्यक्त करतांना सांगितले की हा जो सत्काराचा कार्यक्रम आयोजित केला आहे त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना यातून प्रेरणा मिळावी हा संघटनेचा उद्देश आहे,जो संयुक्तिक आहे.विद्यार्थ्यांनी असाच अभ्यास करून वेगवेगळ्या क्षेत्रात यशस्वी व्हावे असे सांगून त्यांनी शुभेच्छा आणि आशिर्वाद दिले. यशस्वी विद्यार्थ्यीनींचे पालक मिलिंद भंडारी, प्राजक्ता भंडारी, ऋषीकेश जोशी,स्नेहल जोशी यांनी संघटनेने केलेल्या त्यांच्या पाल्याच्या सत्कार बद्दल समाधान व्यक्त केले.

या वेळी ब्राह्मण सेवा मंडळ अध्यक्ष विजय जोशी, सदस्य शेखर कुलकर्णी, राजेंद्र कुलकर्णी, नंदकिशोर भंडारी, भास्कर जोशी, मिलिंद भंडारी, ऋषीकेश जोशी, समर्थ युवा संघटना संस्थापक अध्यक्ष गणेश जोशी, मयुर भंडारी, श्रीपाद खोत, प्रणित सबनीस, गौरव कुलकर्णी, स्मिता कुलकर्णी, अक्षदा जोशी, सुनिता जोशी, राजश्री सबनीस, सुजाता भंडारी, सुरेखा जोशी, ज्योती खोत, लता अग्निहोत्री,रजनी कुलकर्णी, कल्याणी कुलकर्णी, प्राजक्ता भंडारी,स्वाती जोशी, स्नेहल जोशी,पदमा जोशी, तृप्ती केंगे, शलाका कुलकर्णी आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.

निशाणी नं.६

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात**

**दि. कि. अर्ज नं.८७२/२०२३**

१. बन्सीलाल मंगतून पिवाल उ.व.-७१ वर्ष, धंदा-नोकरी
२. सुशिलाबाई बंन्सीलाल पिवाल उ.व.-७० वर्ष, धंदा-घरकाम
३. धनराज बंन्सीलाल पिवाल (मुलगा) उ.व.-४८ वर्ष, धंदा-नोकरी
सर्व रा. प्लॉट नं. ४०, एकता नगर, पीरबाबा दर्गा जवळ, साक्री रोड, ता.जि.धुळे.
४. सीमा कैलास जेधे (मुलगी) उ.व.-४६ वर्ष, धंदा-घरकाम
रा. बाजार गल्ली, मु. पो. देवगांव
५. कपिल धनराज पिवाल उ.व.-२४ वर्ष, धंदा-शिक्षण
६. देवेंद्र धनराज पिवाल उ.व.-२२ वर्ष, धंदा-शिक्षण
दोन्ही रा. प्लॉट नं. ४०, एकता नगर, पीरबाबा दर्गा जवळ, साक्री रोड ता.जि.धुळे .....**अर्जदार**

**विरुध्द**

कै.मंगतून शिवबकस पिवाल
कै.कलीयाबाई मंगतून पिवाल ...**मयत**
कुणीही नाही ...**सामनेवाला**

अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VII, १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा दाखला मिळणेसाठीचा

ज्याअर्थी अर्जदाराने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्थर सो. धुळे दि. / / २०२३ रोजी दि. कि. अर्ज. नं. / २०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदाराने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VII, १८२७ चे कलम प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठीचा अर्जदार हे वरील पत्त्यावर कायम स्वरुपी राहत असून अर्जदार नं. १ चे वडील व अर्जदार नं. २ चे सासरे व ३ ते ६ चे आजोबा असुन, कै. मंगतून शिवबकस पिवाल यांचा मृत्यू दि. १६/०१/१९८९ रोजी सिव्हील हॉस्पीटल ता. जि. धुळे येथे झाला आहे. व अर्जदार नं. १ चे आई व अर्जदार नं. २ चे सासु व ३ ते ६ चे आजी असुन, कै. कलीयाबाई मंगतून पिवाल यांची मृत्यू दि. १७/०४/१९९७ रोजी मोगलाई ता. जि. धुळे येथे झाला आहे. त्यांचा वारसा दाखला मिळणेकामी अर्जदार यांनी धुळे येथील मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढीलचौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौकशी दि.२९/०८/२०२३ ही निश्चित केली आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्थर सो कोर्ट नं. यांचे न्यायालयात निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे.कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :-१८/०७/२०२३ आदेशावरुन

**व.लिपीक** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे** **दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे**

## न्यूज कॉलम

### विषबाधेतून तरुण शेतकऱ्यांचा मृत्यू

**धुळे ।** शेतात फवारणी करतांना विषबाधा होवून तरूण शेतकऱ्यांचा मृत्यू झाला आहे. चुनिलाल साईदास पवार (वय ३६ रा. सावळीतांडा ता. धुळे) असे त्याचे नाव आहे. तो दि.१६ रोजी दुपारी सव्वा चार वाजेच्या सुमारास स्वतःच्या शेतात कपाशी पिकावर फवारणी करीत होता. त्यादरम्यान फवारणीचे विषारी औषध नाकातोंडात गेल्याने तो बेशुध्द पडला. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

### दांपत्याला मारहाण; चौघांवर गुन्हा

**धुळे ।** तालुक्यातील अंचाळेतांडा येथे चौघांनी लताबाई छोटू पवार व तिच्या पतीला शिवीगाळ करीत हाताबुक्क्यांनी मारहाण केली. घरात घुसून साहित्य अस्ताव्यस्त फेकले. तेव्हा लताबाई समजविण्यास गेल्या असता त्यांना पूनम भोमा पवार हिने लाकडी दांडक्याने मारून जखमी केले. घरकुलच्या जागेवर रस्ता द्यावा, या वादातून ७ जुलैला सायंकाळी सातच्या सुमारास ही मारहाण झाली. याबाबत लताबाई पवार यांच्या फिर्यादीवरून धुळे तालुका पोलिस ठाण्यात चौघांविरूद्ध गुन्हा दाखल झाला.

# रतनपुरा पाणीपुरवठा योजनेच्या जलकुंभाचे भूमीपूजन संपन्न

**बाळासाहेब भदाणे यांच्या प्रत्यनाना यश ;जलजीवन मिशन अंतर्गत होणार ३ कोटी २९ लाखांची नळयोजना**

**धुळे । प्रतिनिधी**

रतनपुरा गावासाठी जलजीवन मिशन अंतर्गत तब्बल ३ कोटी २९ लाख २० हजार ३४३ रुपयाची स्वतंत्र नळ पाणीयोजना मंजूरी झाली आहे. बोरकुंडचे प्रथम लोकनियुक्त सरपंच बाळासाहेब भदाणे यांच्या प्रयत्नातून मंजुर झालेल्या या पाणीयोजनेच्या जलकुंभ कामाचे भूमीपुजन करण्यात आले. या संपूर्ण नळयोजनेमुळे गावाचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निकाली निघणार असल्याने ग्रामस्थांतुन समाधान व्यक्त होत आहे.



रतनपुरा गाव हे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेत समाविष्ट होते. सदयस्थितीत ही प्रादेशिक पाणी पुरवठा योजना मात्र बंद आहे. या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या पुर्नजिवनाचा प्रस्तावही शासनास सादर करण्यात आला होता. परंतु सदर प्रस्ताव आर्थिकदृष्टया अव्यवहार्य असल्याने या प्रस्तावास मान्यता मिळाली नाही. सदयस्थितीत रतनपुरा गावासाठी बोरी नदीवर जुन्या योजनेची विहीर असुन त्याव्दारे गावास पुरवठा केला जातो. परंतु उन्हाळयात सदर उद्भवास पाणी कमी पडत असल्याने गावास मोठी पाणी टंचाई जाणवते. आठ-आठ दिवस नळांना पाणी येत नाही. ही प्रादेशीक पाणीपुरवठा योजना कालबाह्य झाली आहे, तसेच गावाचा विस्तास व लोकसंख्या वाढल्याने पाण्याचे स्त्रोत पूर्ण होत नाही. परिणामी ग्रामस्थांची मोठी ससेहोलपट होऊन पाण्यासाठी चांगलीच वणवण होते. पाणीटंचाईमुळे ग्रामस्थांचे होणारे हे हाल पाहता, रतनपुरा गावास स्वतंत्ररित्या नविन योजना मंजुर करणेत यावी अशी मागणी करण्यात आली होती. राज्याचे तत्कालीन ग्रामीण पाणी पुरवठा मंत्री ना.गुलाबराव पाटील यांना प्रत्यक्ष भेटुन बोरकुंडचे प्रथम लोकनियुक्त सरपंच बाळासाहेब भदाणे व माजी जि.प.सदस्य प्रभाकर बुधा पाटील यांनी याबाबत निवेदन दिले होते. ना.पाटील यांना अनेकदा भेटून याबाबत पाठपुरावाही चालविला होता. या अथक प्रयत्नांना व पाठपुराव्यास काही दिवसापूर्वी यश आले असुन रतनपुराच्या बहुप्रतिक्षीत स्वतंत्र पाणीपुरवठा योजनेस शासनाने मंजुरी दिली. यामुळे रतनपुरा गावाचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी सुटणार आहे.

रतनपुरा नळ पाणीपुरवठा कामाचा बाळासाहेब भदाणे यांच्या हस्ते आज शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी बोरकुंडचे प्रथम लोकनियुक्त सरपंच बाळासाहेब रावण भदाणे, माजी जि.प.सदस्य प्रभाकर आबा पाटील, धुळे पंचायत समितीचे उपसभापती देवेंद्र माळी, रतनपुरा सरपंच दगडू माळी, माजी उपसभापती नारायण माळी, माजी सरपंच प्रभाकर माळी, आत्माराम माळी, बन्सीलाल पाटील, भिका अहिरे, ग्रा.पं.सदस्य निलेश माळी, बारकू माळी, गोकुळ माळी, शिवाजी महाले, शायसिंग माळी भटू पाटील, भाईदास भिल, दादाभाऊ माळी, अनिल माळी तसेच सामाजिक कार्यकर्ते मधु माळी, भरत पाटील, गणपत भिल, अनिल भदाणे, आदी उपस्थित होते. या पाणीपुरवठा योजनेतंर्गत कनोली धरणातून थेट रतनपुरा गावापर्यंत व गावतंर्गत अशी एकुण १४ किमी लांबीची जलवाहिनी, १ लाख क्षमतेचा जलकुंभ, पाणी शुध्दीकरण यंत्र, जॅकवेल दूरुस्ती, पंपींग यंत्रसामुग्री आदी कामांचा समावेश असणार आहे. सदरची योजना मंजूर झाल्याने रतनपुरा गटाच्या जि.प.सदस्या अनिता प्रभाकर भदाणे व बोरकुंड गटाच्या जि.प.सदस्या शालिनीताई बाळासाहेब भदाणे यांचेसह पाणी पुरवठा मंत्री ना.गुलाबराव पाटील यांचे परिसरातील ग्रामस्थांनी आभार मानले आहेत.

# नाशिक लोकसभा मतदार संघात ३० कोटींच्या रस्त्यांच्या कामांना मान्यता

**खा. हेमंत गोडसे यांची माहिती**

**नाशिक । प्रतिनिधी**



जिल्ह्याच्या आदिवासी भागातील रस्त्यांचे मजबुतीकरण व काँक्रिटीकरण व्हावे यासाठी खा. हेमंत गोडसे यांच्याकडून सुरू असलेल्या सततच्या प्रयत्नांना यश आले आहे. यासाठी सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पुरवणी मागण्यांमधील तीस कोटी रुपयांच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे. यामुळे इगतपुरी आणि त्र्यंबकेश्वर या आदिवासी तालुक्यासह नाशिक तसेच सिन्नर तालुक्याच्या ग्रामीण भागातील रस्त्यांच्या कामांना लवकरच प्रारंभ होणार असल्याची माहिती खा. हेमंत गोडसे यांनी दिले आहे.

नाशिक लोकसभा मतदारसंघातील इगतपुरी, त्र्यंबकेश्वर ,सिन्नर, नाशिक या तालुक्यांमधील ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरावस्था झालेली आहे. गावांमधील रस्त्यांचे डांबरीकरण तसेच काँक्रीटीकरण होणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी ग्रामीण भागातील रहिवासी तसेच विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांकडून रस्ता दुरुस्तीसाठी खा. हेमंत गोडसे यांच्याकडे सततची मागणी होत होती. नागरिकांकडून आलेल्या मागणीची दखल घेत गेल्या काही महिन्यांपासून खा.गोडसे यांनी रस्त्यांच्या डांबरीकरण आणि काँक्रीटीकरण करण्याच्या प्रस्तावाला मान्यता देण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा सुरू केला होता. खा. गोडसे यांच्या सततच्या प्रयत्नांना यश आले असून कालच्या पुरवणी मागणी अंतर्गत ३० कोटी रुपयें खर्चाच्या रस्त्यांच्या कामाला मान्यता देण्यात आली आहे.

यापैकी २० कोटी रुपयांची कामे आदिवासी विभागाकडून तर उर्वारित १० कोटी रुपयांची कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत देण्यात येणार आहेत. यामुळे इगतपुरी आणि त्र्यंबकेश्वर या आदिवासी तालुक्यासह नाशिक तसेच सिन्नर तालुक्याच्या ग्रामीण भागातील रस्त्यांच्या कामांना लवकरच प्रारंभ होणार असल्याची माहिती खा. हेमंत गोडसे यांनी दिले आहे.

# साक्री राष्ट्रीय लोकअदालत आयोजना संदर्भात आढावा बैठक संपन्न

**साक्री । प्रतिनिधी**

मा. सदस्य सचिव, राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, दिल्ली, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई व मा. श्री. आर. एच. मोहम्मद, प्रमुख जिल्हा न्यायाधीश साहेब तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, धुळे यांच्या आदेशानुसार व सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, धुळे तथा न्यायाधीश संदिप स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय लोकअदालत संदर्भात चर्चा करणेसाठी दिवाणी व फौजदारी न्यायालय येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



दि ०९/०९/२०२३ रोजी संपुर्ण धुळे जिल्हयातील न्यायालयात लोकअदालतीचे आयोजन करावयाचे असल्याने साक्री न्यायालयात सर्व शासकीय अधिकारी, बँक अधिकारी यांचे बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा न्यायाधीश कैलास अढायके यांनी न्यायालयांमधुन जास्तीत जास्त प्रकरणे लोकन्यायालयात निकाली काढण्याच्या दृष्टीने संबंधित प्रकरणातील वकिल वर्ग, पक्षकार, नगरपालिका, पंचायत समिती संबंधित अधिकारी, बँक अधिकारी यांना प्रकरणे तडजोडीसाठी ठेवून तडजोडीसाठी प्रयत्न करण्यासाठी आवाहन करण्यात आले. तसेच उपस्थित सर्व अधिकारी, वकिल यांना जास्तीत जास्त दाखलपूर्व प्रकरणे ठेवुन निकाली काढण्यासाठी प्रयत्न करावे व लोक न्यायालयाचा जास्तीत जास्त प्रचार व प्रसार करण्याचे आवाहन देखील यावेळी न्यायाधीश श्री. अढायके यांनी केले.

सदर आढावा बैठकीसाठी आर.बी.डोळे, सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, साक्री मा.एन.एल.पाटील, २रे सह दिवाणी न्यायाधीश, साक्री, मा.वाय.पी.कासार अध्यक्ष, साक्री तालुका वकिल संघ व सर्व सन्माननीय विधीज्ञ उपस्थित होते. त्याचबरोबर मा. तहसिलदारसाक्री, पोलिस स्टेशन साक्री, निजामपुर व पिंपळनेर चे पोलिस निरीक्षक, पंचायत समिती अधिकारी, नगर पंचायत मुख्याधिकारी, युनियन बँक, व स्टेट बँकेचे प्रतिनिधी उपस्थित होते. मात्र म.रा.वि.वितरण कंपनी, साक्री, बी.एस.एन.एल. कं., बँक ऑफ महाराष्ट्र, बडोदा बँक / देना बँकेचे प्रतिनिधी गैरहजर होते.

तरी सर्व नागरीकांना याद्वारे आवाहन करण्यात आले की त्यांनी दि ०९/०९/२०२३ रोजी होणा-या राष्ट्रीय लोक अदालतीत आपली प्रलंबित व दाखलपूर्व प्रकरणे जास्तीत जास्त प्रमाणात ठेवुन लोक न्यायालयातचा लाभ घ्यावा असे देखील सांगितले.



# जैताणे येथे साथरोगा बाबत जनजागृती

**जैताणे । प्रतिनिधी**

निजामपूर उपकेंद्रामार्फत उर्दू विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी जलजन्य, कीटकजन्य व हवेतून पसरणाऱ्या आजारासंदर्भात मार्गदर्शन पर कार्यक्रम घेण्यात आला.

जिल्हा हिवताप अधिकारी यांच्या आदेशानुसार व तालुका वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार जैताणे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. गायत्री अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक वृंद व कर्मचारी व तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र येथील कर्मचारी आरोग्य सहाय्यक कैलास शिंदे यांनी विद्यार्थ्यांना कीटकजन्य आजाराबाबत माहिती दिली. तसेच डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया या आजारापासून आपल्याला कसे संरक्षण करता येईल त्याबाबत सविस्तर माहिती देऊन विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली. याप्रसंगी आरोग्य सेवक चंद्रशेखर सोनवणे व आरोग्य सेविका सुमन चव्हाण व शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छत्रपती पतसंस्थेचा विद्यार्थी गुणगौरव उपक्रम प्रेरणादायी- डॉ. ढिकले

**नाशिक । प्रतिनिधी**

छत्रपती नाशिक जिल्हा पतसंस्था गेल्या ३० वर्षापासून नाशिक जिल्हयामध्ये सर्वसामान्य सभासदांना पतपुरवठा करून विकासाला चालना देत आहे. तर संस्थेच्या हा सभासद पाल्य गुणगौरव समारंभ नक्कीच प्रेरणादायी आहे. असे प्रतिपादन प्रतिपादन नाशिक जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष व मराठा विद्या प्रसारक संस्था अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले यांनी केले.



छत्रपती नाशिक जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था नाशिक शाखेतर्फे ३० व्या वर्धापदिनानिमित्त व संस्थापक अध्यक्ष कॉ. माधवराव गायकवाड यांच्या ९९ जयंतीनिमित्त काल १६ रोजी सकाळी १० वाजता संस्था सभासद, ठेवीदार, गुणवंत पाल्यांचा सत्कार संस्थेच्या मेघदूत शॉपिंग सेंटर नाशिक कार्यालयात आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी नाशिक जिल्हा पतसंस्था फेडरेशन जिल्हाध्यक्षपदी डॉ. सुनील ढिकले व कार्याध्यक्षपदी नारायण वाजे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. तर संस्थेच्या सभासद सुवर्णा देसले यांनी पीएचडी मिळविल्याने त्यांचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रमूख म्हणून मार्गदर्शन करताना डॉ. सुनील ढिकले यांनी छत्रपती नाशिक जिल्हा पतसंस्था ३० वर्षापासून नाशिक जिल्हयामध्ये सर्वसामान्य सभासदांना पतपुरवठा करून विकासाला चालना देत आपल्याबद्दल अभिनंदन केले. आठ शाखा जिल्ह्यात कार्यरत आहेत. याप्रसंगी नारायण वाजे यांनी सहकार चळवळीतील सभासदाचे महत्व सांगितले. छत्रपती पतसंस्था चांगले काम करते आहे याबद्दल कौतुक केले. अध्यक्षस्थानी छत्रपती नाशिक जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था चेअरमन ड.साधना गायकवाड होत्या. त्यांनी कॉ. माधवराव गायकवाड यांच्या सहकार शेत्रातील कार्याची माहिती दिली. पुढील वर्षी कॉ.माधवराव गायकवाड यांची १०० वी जयंती आहे. प्रसंगी व्यासपीठावर व्हाइस चेअरमन शिवाजी जाधव, संचालक दत्ता निकम, कॉ. राजू देसले, धर्मेंद्र जाधव, भागवत पाटील, श्याम गरुड, ओझरचे शाखा व्यवस्थापक अण्णा गुर्गुडे, चारुदत्त पवार, संस्थेचे सभासद, अल्पबचत खातेदार, ठेवीदार आदी उपस्थित होते. सूत्रसंचलन संचालक राजू देसले यांनी, प्रास्ताविक चारुदत्त पवार यांनी तर आभार शशिकिरण साखला यांनी केले. स्वागत भालचंद्र देसले, किरण मालुंजकर, राकेश वालझाडे, रामदास बेंडकोली, रोहित कर्पे, श्रीमाल यांनी केले.

# हस्ती स्कूल येथे विद्यार्थी व पालकांसाठी 'प्रेरणादायी व्याख्यान' संपन्न

**दोंडाईचा । प्रतिनिधी**

हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलीत हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्यु. कॉलेज व हस्ती वर्ल्ड स्कूल आणि हस्ती गुरूकुल दाउळ शिवार कँपस् दोंडाईचा येथे दि. १७ जुलै २०२३ सोमवार रोजी हस्ती स्कूल शालेय समिती चेअरमन कैलास जैन यांचे मार्गदर्शनाने विद्यार्थी व पालकांसाठी व्याख्याते मा. विक्रम अग्निहोत्री - इंदौर - दोन्ही हात नसतांना; पायांनी कार चालविण्याचे कायम स्वरूपी ड्रायव्हिंग लायसन्स प्राप्त पहिले भारतीय. यांचे प्रेरणादायी व्याख्यान संपन्न झाले.



व्याख्यान कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने करण्यात आली. याप्रसंगी व्याख्याते विक्रम अग्निहोत्री, आदरणीय मम्मीजी लिलावतीजी जैन, आदरणीय काकीजी चंद्रावतीजी जैन, शालेय समिती चेअरमन कैलास जैन हे मान्यवर उपस्थित होते.

'प्रेरणादायी व्याख्यान ' दरम्यान विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करतांना विक्रम अग्निहोत्री म्हणाले की, आजची मुले ही उद्याच्या भारताचं भविष्य आहे. त्यांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष द्या. जीवन प्रवासात चढ उतार, समस्या येतच असतात. यांना न डगमगता यशस्वी रित्या सामोर जाण्यासाठी सदैव सकारात्मक दृष्टी ठेवा. दिव्यांगता हा एक विचार आहे. प्राप्त परिस्थितीत काय करता येईल ? याचा विचार करा. सदैव पुढे चालत राहा. आपण परिस्थिती बदलवू शकत नाही. म्हणून जीवनात बदल स्विकारा. आज चांगले कराल, तर भविष्य उत्तम व सुरक्षित राहिल. सतत प्रयत्नरत राहणं हे कर्तव्य आहे. अपयशाची भीती बाळगू नका. स्वत:वर विश्वास ठेवा. स्वत: स्विकारा तरच जग स्विकारेल. जीवनात दूरदृष्टिकोन बाळगा. लक्ष छोटे ठेवा. म्हणजे लवकर गाठता येईल. यासाठी आत्मविश्वास, कष्ट, परिश्रम, जिद्द, चिकाटी, कृतज्ञता अंगी बाणवा. सोबतच व्याख्यान दरम्यान अग्निहोत्रींनी आपल्या वयाच्या सातव्या वर्षी वैयक्तिक जीवनात आलेले संकट; अर्थात अपघातामुळे दोन्ही हात खांद्यापासून काढावे लागले. तरीही मोठ्या जिद्दीने आपल्या पायांनीच जीवनक्रम अविरतपणे कसा सुरू ठेवला ? यात कपडे इस्त्री करणे, लिहिणे, जेवण करणे याबाबतची चित्रफीत द्वारा माहिती सांगितली. यावेळी व्याख्यान स्थळी उपस्थितीत अचंबीत झाले. यावेळी अग्निहोत्रींनी आपल्या दैनंदिन जीवनात दिव्यांगतेवर मात करत; शिक्षण, खेळ, पोहणे, छंद व कला कशा जोपासल्या ? पायांनी सर्व क्रिया कशा अवगत केल्या ? आणि विशेषत: पायाने कार चालविणेसाठीचे कायम स्वरूपी लायसन्स कसे प्राप्त केले ? कार रेस कशी जिंकली ? याबाबतीत माहिती सांगितली. तसेच त्यांनी स्वत:च्या ' लुक माँ, नो हँडस् ' या शिर्षकाचे पुस्तकाबाबतही चर्चा केली. कार्यक्रमास पालक बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन शिक्षिका प्रतिष्ठा परमार व शिक्षक विजेंद्र भोई यांनी केले.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था
Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438,
प्रा.भूषण पाटील: 7709100798
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518, सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र





# मोराणे शिवारात जुगारअड्ड्यावर कारवाई














धुळे।
महिंदळे शिवारात चालणार्या एका पत्त्याच्या क्लबवर आयजींच्या पथकाने धाड टाकली. या कारवाईत सुमारे ३० लाखांचा ऐवज आणि ३१ जुगार्यांना जेरबंद करण्यात आले. एकिकडे एसपी संजय बारकुंड जिल्ह्यातील अवैध धंदे बंद असल्याचे सांगत असून दुसरीकडे खुलेआम पत्त्यांचे डाव खेळले जात असल्याचे कारवाईतून उघड झाले. त्यामुळे पोलीस दलाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होताच एसपी संजय बारकुंड यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी आणि कर्मचार्यांना फैलावर घेतले आहे. एलसीबीचे पीआय हेमंत पाटील यांच्याकडून तडकाफडकी एलसीबीचा पदभार काढून घेत त्यांची रवानगी नियंत्रण कक्षात होणार आहे.

गेल्या काही महिन्यात गंभीर गुन्ह्यांच्या डिटेक्शनचा जोरात धडाका लावला होता. त्यामुळे आरोपींच्या अटकेचे प्रमाण वाढले होते. पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांनी एलसीबीची धुरा सांभाळल्यापासून डिटेक्शनची ही गती प्रचंड वाढल्याचे मानले जात होते. त्यांच्या कामाच्या वेगळ्या पद्धतीमुळे अधिनस्त यंत्रणेनेही मरगळ झटकली. त्यांच्या वाढलेल्या कामाच्या गतीचे चांगले परिणामही अल्पावधीतच दिसू लागले होते. मात्र एलसीबीचे पीआय हेमंत पाटील यांच्याकडून तडकाफडकी एलसीबीचा पदभार काढून घेत त्यांची रवानगी नियंत्रण कक्षात होणार आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये कारवाईची दिवसभर चर्चा होती. मोराणे शिवारात चालणाऱ्या पत्त्यांचा क्लबच्या बाबतीत तालुका पोलिस अनभिज्ञ कसे होते. या बाबत देखील नागरिकांमध्ये चर्चा होती. नाशिक मधील पथक येऊन कारवाई करते. तरीदेखील तालुका पोलीसांना याबाबत सुगावा देखील नाही हा देखील मोठा संशोधनाचा विषय झाला आहे. या कारवाई बाबतीत तालुका पोलीसांना विचारांना होणे देखील गरजेचे आहे. तसेच तालुका पोलीसांच्या दुर्लक्षामुळे मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी देखील वाढत आहे. तालुक्यातील अनेक गुन्हे दाखल होऊन देखील त्यांचा तपास होत नाही. यामुळे अनेक वेळा तालुका पोलिस स्टेशन विरोध अनेक नागरिक पोलिस अधीक्षक कडे तक्रार करता. मात्र तरी देखील तालुका पोलिस कोणत्याही गोष्टीसाठी गांभीर्य लक्षात घेऊन कारवाई करतांना दिसत नाही. या जुगार अड्ड्यावर तालुका पोलीसांनी का छापा टाकून कारवाई केली नाही यांची देखील चौकशी होणे गरजेचे आहे. अशी देखील चर्चा नागरिकांमध्ये होती.

संकलन : दिपक वाघ

CMYK

दैनिक लक्ष महाराष्ट्र





# अपघातग्रस्त बस दरीतून बाहेर काढण्याचे काम फत्ते!















नाशिक । १२ जुलैला गणपती टप्प्यावरून बस दरीत कोसळली होती, तीन क्रेन, आपत्ती व्यवस्थापन व स्थानिक नागरिकांच्या मदतीने बसला दरीतून बाहेर काढण्याची मोहीम फत्ते झाले आहे. मागील आठवड्यात १२ जुलै रोजी सप्तशृंग गडावरील गणपती टप्प्याजवळ बस कोसळली होती. या अपघातात बसमधील एक महिला प्रवाशाचा मृत्यू झाला होता तर चालक वाहक यांच्यासह २२ जण जखमी झाले होते. सप्तशृंगगड ते नांदुरी आणि नांदुरी ते सप्तशृंगगड रस्ता (१९ जुलै) बंद ठेवला होता. नाशिकच्या सप्तशृंगगड येथे १२ जुलैला झालेल्या अपघातातील अपघात ग्रस्त बस दरीच्या बाहेर काढण्याचे काम युद्धपातळीवर आज सकाळी दहा वाजता सुरु केले होते. ३ क्रेनसह आपत्ती व्यवस्थापन, कळवण बस आगार, पोलीस प्रशासन, वन विभाग तसेच स्थानिक ग्रामपंचायतीतील ग्रामस्थ यांच्या मदतीने बस दरीतून काढण्याची कार्यवाही पूर्ण केली. मागील आठवड्यात अपघात होऊन दरीत कोसळलेली बस काढण्यासाठी हा रस्ता बंद करण्यात आला होता. सकाळी दहा ते कार्यवाही सुरु करण्यात आली होती. १२ जुलै रोजी सकाळच्या सुमारास नाशिकच्या सप्तशृंगी गड घाटात बसला भीषण अपघात झाला. सप्तशृंगी गडावरुन बस साडेसहा वाजता निघाल्यानंतर पुढच्या दहा मिनिटात घाटातील गणपती पॉईंटजवळ बसला अपघात झाला. या अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला आहे. ही बस सप्तशृंगी गडावरुन खामगावच्या दिशेने निघाली होती. त्यावेळी घाटातील गणपती टप्प्यावरुन बस थेट दरीत कोसळली.